# स्त्री सबलीकरण संकल्पना, उपाययोजना आणि आव्हाने

**डॉ.विनोद नारायणदास बैरागी**
विभागप्रमुख,
राज्यशास्त्र विभाग व संशोधन मार्गदर्शक
चेतना शिक्षण प्रसारक मंडळाचे कला वरिष्ठ महाविद्यालय, हर्सुल सावंगी, औरंगाबाद.
E-mail – bairagivn@gmail.com
Mob. 8275086692

---

स्त्री सबलीकरण संकल्पना २१ व्या शतकात स्त्री चळवळीच्या वाढत्या दडपणातून स्त्री सबलीकरण प्रश्न समाजकारण आणि राजकारणाच्या केंद्रस्थानी आलेला आहे. स्त्री सबलीकरणाची जागतिक पातळीवरील चळवळीतून विविध देशात वेगवेगळया योजना, कार्यक्रम, कायदे आणि सुखसुविधा निर्माण करण्याचे प्रयत्न व्यापक पातळीवर सुरु आहेत. सद्य:काळात प्रत्येक देशाच्या राजकीय प्रक्रियेत स्त्री सबलीकरणाला महत्व प्राप्त आहे. ‘‘स्त्री सबलीकरण चळवळीची प्रमुख मागण स्त्री जोपर्यंत सबल होत नाही तोपर्यंत शोषण मुक्त होऊ शकत नाही आणि जोपर्यंत शोषण मुक्त होत नाही तोपर्यंत ती सबल होणार नाही आणि सबल झाल्याशिवाय स्त्री स्वतंत्र होऊ शकणार नाही.’’[१] स्त्रीला स्वतंत्र करण्यासाठी स्त्री सबलीकरणाची आवश्यकता आहे. स्त्री सबलीकरण म्हणजे स्त्रीला बलवान करणे वा तिला बळ देणे आणि ते बळ सत्ता मिळाल्याशिवाय शक्य नाही. सत्तेतून स्त्रियाकडे नियंत्रणाची शक्यी येईल. स्त्री सबलीकरणात सत्तेच्या नियंत्रणाची सूत्रे बदलणे आणि स्तर बदलणे अपेक्षित आहे. त्यासाठी स्त्रियांनी सत्ता संपादन करणे आवश्यक आहे. सत्तेतील स्त्रियाचा वाटा वाढविणे आवश्यक आहे. स्त्री सबलीकरण म्हणजे स्त्रियांना सत्ता विभागणीत समान वाटा वा निर्णय प्रकियेत योग्य देण्यासाठी पुढील उपाय सांगितली जातात.

- स्त्रियाचा राजकीय सत्तेतील सक्रिय व समान सभाग वाढविणे त्यावरील कुटंबाचे ओझे कमी करणे.
- गैरसरकारी संघटकाची उभारणी करुन त्यामार्फत स्त्रीयाचा प्रश्न सोडविण्याची गती वाढविणे.
- स्त्रियाना मुक्त होण्यासाठी प्रस्थापित समाजव्यवस्थेच्या सर्व अंगात परिवर्तन होणे आवश्यक आहे.

मानवी समाज व्यवस्थेतील नैसर्गिक व सर्व प्रकारच्या संसाधनावर पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांना अधिकार म्हणजे स्त्री सबलीकरण मानले जाते. त्यासाठी सत्ता विभागणी, निर्णय प्रक्रिया, सामाजिक, राजकीय आणि आर्थिक जीवनात स्त्रियांना समानता प्राप्त करुन देणे गरजेचे आहे. स्त्रियांना उच्च दर्जाच्या भौतिक सुविधा व विकासाची समान कल्पनांचे उच्चाटन करणे आवश्यक आहेत्र तसेच दारिद्रय, अज्ञान, अंधविश्वास, अनावश्यक रुढी व परंपरा इत्यादी स्त्री सुधारणाचा वेग वाढविणे गरजेचे आहे. त्यासाठी स्त्री शिक्षणाचे प्रमाण वाढविणे, त्यांच्या जाणिव जागृती निर्माण करण्याची आवश्यकता आहे. प्रबंळ राजकीय इच्छाशक्तीच्या अभावी स्त्री सबलीकरणाची संकल्पना यशस्वी होणे शक्य नाही.

भारतीय राज्यघटना आणि स्त्रीसबलीकरण भारतीय राज्यघटना हा स्त्री सबलीकरणाच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण दस्ताऐवज मानला जातो. भारतीय राज्यघटनेने स्त्री पुरुष विषमता आणि स्त्रियाच्या दुय्यम स्थानाबाबतच्या परंपरागत मतांना छेत देत अनेक आधुनिक कायद्यांच्या घटनेत समावेश केलेला आहे. घटनेच्या १५व्या कलमानुसार कायद्यासमोर समानता आणि कायद्याचे समा संरक्षण दिलेले आहे. १६ व्या कलमानुसार धर्म, वंश, लिंग, जन्मस्थान इत्यादी घटकाच्या आधारावर केलेला भेदभाव नष्ट करुन सर्वांना समान संधी दिलेली आहे. १९ व्या कलमानुसार पुरुषासोबत स्त्रियांना देखील वास्तव्य, व्यवसाय, संचार आणि संघटना अशी सप्त स्वातंत्र्य बहाल केलेली आहेत. डी. डी. बसूच्या मते, “भारतीय राज्यघटनेच्या २१ व्या कलमानुसार सर्व स्त्री-पुरुष नागरिकांना समान स्वरुपात जीवन जगण्याचा अधिकार, जीवनासाठी आवश्यक पर्याप्त साधने प्राप्त करण्याचा अधिकार आहे. त्यासोबत त्यांच्यासाठी कामाच्या ठिकाणी न्यायपूर्ण आणि मानवतावादी वातावरण असले पाहिजे. प्रत्येक स्त्री-पुरुषांना विशिष्ट जीवन स्तर प्राप्ती करण्यासाठी आवश्यक सामाजिक आणि सांस्कृतिक संधी मिळाली पाहिजे.’’[२] भारतीय राज्यघटनेने स्त्री पुरुषाच्या समान अधिकाराचे समर्थन केलेले आहे. घटनेच्या २३ व्या कलमानुसार स्त्रियांवर गुलामी लादणारया आणि शोषण करणाऱ्या सर्व प्रथांना घटनाबाह्य मानलेल्या आहेत. घटनेच्या २५ ते २८ कलमानुसार स्त्रियाना पुरुषांच्या बरोबरीने धार्मिक स्वातंत्र्य, ३२ व्या कलमानुसार घटनात्मक अधिकाराच्या संरक्षणाचा अधिकार बहाल केलेला आहे. भारतीय राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वात घटनेच्या ३८ व्या कलमानुसार स्त्री पुरुषांना समान कामासाठी समान वेतन, कलम ४२ नुसार प्रसुतीकाळ स्त्रियांना सहाय्याची तरतूद केलेली आहे. काम करण्याच्या परिस्थितीत न्याय व मानवी वातावरणाचा आग्रह घटनाकारांनी धरलेला दिसून येतो. भारतीय राज्यघटनेच्या ५१ क (ड) नुसार, “भारत के प्रत्येक नागरिक का यह कर्तव्य होगा कि वह ऐसी प्रथाओं का त्याग करें जो महिलाओं के सम्मान के विरुद्ध है ।"[३] भारतीय राज्यघटनेने महिला सबलीकरणाच्या दृष्टिकोनातून महत्त्वपूर्ण तरतूदीचा समावेश केलेला असला तरी त्या वास्तवतेत केले आहे की, “स्वातंत्र्यानंतर महिलाची स्थिती चांगली होईल, नवीन शिक्षण पद्धती आणि आधुनिकतेतून समाजात सहभाग दर्शवेल ही अपेक्षा पण ते वास्तवतेत येऊ शकले नाही. स्वातंत्र्यनंतर काही प्रमाणात स्त्रियांना जागृती आलेली आहे. सर्व क्षेत्रात पहिल्यापेक्षा महिलाची संख्या व उपस्थिती वाढले असली तरी महिलांच्या शोषणाच्या घटना कमी झाल्या नाहीत तसेच त्यांच्यावरील अत्याचार कमी झालेले नाहीत. अनेक काययदेशीर तरतूदीनंतरही महिला स्वत:ला असुरक्षित मानतात"[४] याचा अर्थ भारतीय राज्यघटनेने महिला सबलीकरणाच्या दृष्टीने अनेक तरतूदीचा समावेश केलेला असला तरी अंमलबजावणीच्या पातळीवर अजूनही व्यापक प्रयत्न करण्याची गरज आहे.

महिला सबलीकरणासाठी शासकीय पातळीवरील प्रयत्न शासनाने महिलाच्या समस्याचे अध्ययन करण्यासाठी १९५३ मध्ये श्रीमती दुर्गाबाई देशमुख अध्यक्षतेखाली केंद्रीय समजाकल्याण बोर्डाची स्थापन केला. या बोर्डात महिलाच्या स्थितीचा अभ्यास करण्यासाठी १९७१ मध्ये एक समिती नियुक्त केली. समितीने प्रसिद्ध केलेला अहवाल 'टुवर्ड्स इक्वैलिटी' च्या नावाने प्रसिद्ध केला. त्या आधारावर सहाव्या पंचवार्षिक योजनेत महिलाच्या विकासासाठी अनेक विकास कार्यक्रमाचा समावेश केला. १९८५ मध्ये मानव संसाधन विकास मंत्रालयाच्या अंतर्गत महिला आणि बालविकास विभाग निर्माण करण्यात आला. १९९० मध्ये राष्ट्रीय महिला आयोग अधिनियम संमत करण्यात आला. त्या अधिनियमाच्या आधारावर १९९२ मध्ये राष्ट्रीय महिला आयोगाचे गठन करण्यात आले आहे. १९९३ मध्ये राष्ट्रीय महिला कोषाची निर्मिती केली. २००८ मध्य भारत

सरकार राष्ट्रीय महिला सबलीकरणाची घोषणा केली. मनमोहन सिंग सरकारने महिलासाठी स्वतंत्र्य बँक निर्मितीचा निर्णय घेतलेला दिसतो. स्वातंत्र्योत्तर भारतात लोकशाहीच्या यशास महिलाना स्वातंत्र्य देणे आवश्यक होते कारण लेनीन मते. “शोषित वर्ग जोपर्यंत स्वातंत्र्य प्राप्त करु शकत नाही जोपर्यंत महिलाना विकासासाठी स्वातंत्र्य उपलब्ध करून दिले जात नाही. महिला राजकारण आणि सार्वजनिक कामाच्या विधानावरुन महिला सबलीकरणाची गरज विशद होते.”[५]

महिलांच्या चळवळीतील अनेक कार्यकर्ते आणि नेत्यांनी महिलाच्या विकासासाठी विविध स्वरुपाच्या मागण्या केलेल्या आहेत. त्यासाठी वेळोवेळी महिला संघटनानी प्रयत्न केलेल्या आहेत. महिला सबलीकरणासाठी शासनाने विविध कायदे केलेले दिसतात. त्यात द्विभार्या प्रतिबंधक कायदा, हुंडाबंदीचा कायदा १९६१, हिंदु विवाह कायदा १९५५, हिंदु उत्तराधिकार कायदा १९७८, पोटगीचा कायदा, वारसा हक्काचा कायदा, घटस्फोटाचा कायदा, कौटंबिक हिंसाचार कायदा २००५ इत्यादी विषयक कायदे केलेले दिसून येतात. या कायद्याच्या माध्यमातून स्त्रियांना संरक्षण देण्याचा प्रयत्न केलेला आहे. कौटूंबिक हिंसाचार कायदा करुन कुटुंबात होणाऱ्या अन्याय अत्याचार विरुद्ध दाद मागण्याचा अधिकार दिलेला आहे. स्त्रियांना गर्भपाताचा अधिकार देऊन अनावश्यक मातृत्वापासून सुटका करण्यास मदत केली आहे. स्त्री पुरुषांचे लिंग गुणोत्तर मोठी तफावत आल्यान गर्भलिंग चाचणीवर बंदी आणून स्त्री भ्रूण हत्या रोखण्यासाठी या कायदामुळे मदत मिळाली असून समाजातील स्त्रियाची कमी होणारी लोकसंख्या प्रतिबंध लावता येऊ शकतो. महिलांना मालमत्तेत पुरुषांच्या बरोबरीने वाटा मिळवून देण्यासाठी विविध कायदे करुन स्त्रियांना सासरच्या नव्हे तर माहेरच्या मालमत्तेत वाटा मिळवून दिला. घटस्फोटीतस्त्री अज्ञान कमी करण्यासाठी मुलीसाठी स्वतंत्र शाळा, वसतीगृहे, स्कॉलरशिपची तरतूद केली आहे. दत्तक पालक योजना राबविल्या आहेत. महिलांना स्वयंरोजगार मिळवून देण्यासाठी प्रशिक्षणाची सोय, कर्ज उपलब्धता, महिलांसाठी स्वतंत्र बँकाची स्थापना केली आहे. स्त्रियांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्यासाठी समान काम समान वेतनाचा अधिकार, महिलासाठी नोकरीत राखीव जागाची तरतूद, रोजगाराच्या ठिकाणी पाळणाघरे, महिलाच्या रात्रपाळीवर बंदी इत्यादीबाबत कायदे करुन शासनाने महिलाच्या कल्याणासाठी प्रयत्न केले आहे. राजकीय क्षेत्रात महिलांना प्रतिनिधत्व मिळवून देण्यासाठी ग्रामीण व स्थानिक स्वराज्य संस्थेत ५० टक्के जागा आरक्षित केली आहेत. पदाधिकारी पदासाठी आरक्षणाची तरतूद असल्यामुळे अनेक स्त्रिया जिल्हापरिषद अध्यक्ष, महापौर, पंचायतसमिती सभापती, संरपंच पदावर काम करतांना दिसतात.

शासनाने महिला संघटनांनी केलेल्या अनेक मागण्या मान्य केलेल्या असला तरी त्यांचे सर्व प्रश्नांचे निराकरण झालेले नाही. म्हणून जस्टिस देसाईच्या मते, 'महिला संरक्षणासाठी बनविलेले कायदे केवळ कागदावर अस्तित्वात आहेत. महिला न्याय मिळविण्यासाठी आजही दीर्घकालीन कायदेविषयक प्रक्रियेतून जावे लागते त्यातून त्याच्यात वैफल्य भावनाचा विकास होऊन अन्यायाला विरोध करण्याऐवजी अन्याय सहन करण्याची प्रवृत्ती वाढत जाते.' त्यांच्यावरील अन्याय सद्य:स्थितीतही झालेले नाहीत. कारण महिलांच्या बाबतीत अजूनहीसमाजाच्या मूलभूत दृष्टिकोनात फारसा फरक पडलेला नाही म्हणून त्यासाठी व्यापक प्रयत्नाची गरज आहे.

महिला सबलीकरणासाठी अशासकीय पातळीवरील प्रयत्न - महिला सबलीकरणाच्या उद्देशाने भारतात अनेक स्वयंसेवी संघटनेची निर्मिती झालेली आहे. पातळीवर स्थापन झालेल्या काही संस्था सरकार आणि परदेशातील मिळणाऱ्या देणग्या आणि अनुदानावर चालतात. तरी काही संस्था जनमदतीवर अन्याय अत्याचा राच्या जागृतीबाबत स्वयंसेवी संस्थांनी मोठ्या प्रमाणावर कार्य केलेले दिसतो. उदा. दिल्ली येथील निर्भया बलात्कार कांडाप्रसंगी शासनावर दडपण आणण्याचे आणि बलात्काराच्या कायद्यात बदल घडवून आणण्यासाठी दबाव आणण्याची महत्वपूर्ण कामगिरी स्वयंसेवी संस्थांनी पार पाडलेली असते. याशिवाय महिलांना शिक्षणासाठी प्रयत्न करणे, स्त्री शिक्षणाचा प्रसार व प्रचार करणे, स्त्रियामध्ये आपल्या समस्याबाबत जागृती घडवून आणणे, महिलांना स्वयंरोजगारासाठी प्रशिक्षण देणे, विधवा, वंचित वर्गातील महिलंना आश्रय देणे, महिलांना व्यवसायासाठी कज' मिळवून देणे, महिलाचे प्रश्न सोडविण्यासाठी मोर्च, आंदोलने करणे, मंत्र्यांना निवेदन देणे, शासकीय समितीवर प्रतिनिधित्वि मिळवून महिला अत्याचार प्रतिबंधक कायद्याच्या निर्मितीसाठी सहाय्य करणे, महिलामध्ये जागृती निर्माण करण्यासाठी मासिके चालविणे, वेश्या व्यवसायातील महिलाच्या आरोग्यविषयक प्रश्नांना चालना देणे, महिलांना सुविधा मिळवून देणे इत्यादी कार्य अशासकीय कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्था मार्फत चालत आहे. महिला आर्थिक परावलंबनातून होणाऱ्या शोषणाबद्दल एंगल्स आपल्या 'Family, Private Property and Origin of State' ग्रंथात लिहिता की, "विवाहात पुरुषांची श्रेष्ठता ही आर्थिक श्रेष्ठतेचा परिणाम आहे. आर्थिक श्रेष्ठता नष्ट झाल्यास वैवाहिक जीवनातील पुरुषांचे श्रेष्ठता देखील नष्ट होईल."[६] महिलांच्या मानवी हक्कासाठी या संघटना मोठ्या प्रमाणावर कार्यरत आहेत. परंतु भारतासारख्या विशाल देशात महिलाच्या संख्येच्या मार्गाने अत्यंत कमी प्रमाणात स्वयंसेवी संघटनाचे अस्तित्व असल्यामुळे सव महिलाच्या प्रश्नांना संघटनाकडून न्याय मिळत नाही तसेच बऱ्याच स्वयंसेवी संस्था अनुदान आणि देणग्या पुरत्या कार्य करतात. प्रत्यक्षात कार्याऐवजी देखवा उभा करण्यात धन्यता मानतात म्हणून महिलाच्या प्रश्नापना चालना मिळत नाही. या मर्यादा असल्या तरी देखील स्वयंसेवी संघटनांनी स्त्रियांच्या विकासासाठी व्यापक प्रयत्न केलेले दिसतात. त्यांच्या कार्यामुळे शासन दरबारी आणि समाजात महिलाच्या सबलीकरणाबाबत सकारात्मक पावले उचलेली जात आहेत त्याचे श्रेय स्वयंसेवी संघटनाना आहे.

**स्त्री सबलीकरणासाठी उपाययोजना**

स्त्री सबलीकरणासाठी पुढील उपाययोजना सांगितल्या जातात

१. स्त्रीमुक्ती सोबत स्त्रीशक्ती विकसित होण्यासाठी स्त्रीचे सबलीकरण होणे महत्वाचे त्याच्यासाठी ही चळवळ एकस स्वरुपात आणण्यासाठी प्रयत्न करणे

२. स्त्री चळवळ ही दबाबगटात रुपांतरीत झाल्याशिवाय स्त्रियांना हक्क मिळणार नाहीत.

३. आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय पातळीवर मान्य अधिकार स्त्रियांना उपभोगता येतील यासाठी प्रयत्न केले पाहिजे.

४. गुलाबरोबर मुलींनाही समान हक्क व वागणूक मिळाली पाहिजे. लैंगिक विषमता दूर करण्यासाठी उपाययोजना केल्या पाहिजेत.

५. शासकीय प्रयत्नाबरोबर स्थानिक पातळीवर संघटनात्मक प्रयत्न होऊन स्त्री संघटनाची उभारणी केली पाहिजे आणि त्याद्वारे स्त्री विकासाचे कार्यक्रम आखले पाहिजे.

६. शिक्षणाचा हक्क कायद्याचे ज्ञान, अधिकार प्राप्ती इ. धोरणाची अंमलबजावणी अधिका-अधिक स्त्री शक्तीकरण घडवून आणण्याशिवाय स्त्री सबलीकरणाचे उद्दिष्ट साध्य होणार नाही.

७. जागतिकीकरणामुळे माहितीचा स्फोट झाला आहे. माहिती अधिकाराचा वापर करुन ज्ञानाधिष्ठीत समाज निर्मितीचा प्रयत्न झाला आहे.

८. शिक्षणाचा हक्क कायद्याचे ज्ञान, अधिकार प्राप्ती तसेच आर्थिक आणि आन्य धोरणाची अंमलबजावणी समाज अधिकाधिक स्त्री शक्तीकरण घडवून आल्याशिवाय स्त्री सबलीकरणाचे ध्येय साध्य होणार नाही.

स्त्रीसबलीकरणा पुढील आवाहने आणि स्त्रिवादाची स्त्री सबलीकरणाची संकल्पना साध्य होण्यासाठी समाजव्यवस्थेच्या सर्व अंगात परिवर्तन अभिप्रेत आहे. कोणत्याही व्यवस्थेत भाषा आणि साहित्याच्या माध्यमातून सर्वप्रथम परिवर्तने येतात. त्यासाठी भाषा आणि साहित्यातील पारंपरिक स्त्री विरोधी मांडणी नाकारणे आवश्यक आहे. संस्कृतीतील नीतीतत्वे आणि धर्म ग्रंथातील स्त्रीविषयक भूमिकेची चिकित्सा करुन नव्याने वैचारिक मांडणी केली पाहिजे. परंपरागत समाजाच्या आधारावर हल्ला चढविणे गरजेचे आहे. आधुनिक काळात स्त्रियांना मिळालेले स्वातंत्र्य आणि कायदेशीर हक्कामुळे सर्व क्षेत्रात त्यांच्या वावर वाढलेला आहे. मात्र पुरुषप्रधान व्यवस्था धर्मवाद, कर्मकांड, बुवाबाजी यांच्या माध्यमातून पुरुषप्रधान व्यवस्था कायमवरुपा स्थिर करण्याचा प्रतिक्रांतीवादी प्रयत्न जोरात सुरु आहे. त्यास योग्य मार्गाने शह देण्याऐवजी स्त्री मुक्ती चळवळी पुरुषाविषयी गैरसमज, असहयोग, पुरुष कुटुंब व्यवस्था व विवाह संस्थेला विरोध, समलिंगी संबंधाचे समर्थन करुन पुरुषाची वर्चस्वाच्या विरोधात नकारासतमक भूमिकाचे समर्थन करतात. पुरुषी वर्चस्वास मोडून टाकण्यासाठी अतेरिकी भूमिका स्वीकार केला जात आहे. स्त्री स्वातंत्र्याऐवजी स्वैराचारास प्राधान्य देत आहेत. त्यातून नवीन समस्या जन्माला येतात. त्यामुळे स्त्री स्वातंत्र्य होण्याऐवजी अधिक असुरक्षित होण्याची शक्यताजास्त दिसते. ही भूमिका वैचारिक दृष्ट्या गोंधळ निर्माण करणारी आहे. ही भूमिका बदलून स्त्री प्रश्नाबद्दल सहानुभूती असलेल्या पुरुषाचे सहकार्य घेऊन ही चळवळ यशस्वी करता येईल याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

स्त्री सबलीकरण ही आधुनिक काळातील चळवळ आहे. ही चळवळ खऱ्या अर्थाने दुसऱ्या महायुद्धांनतर जगातील सर्व भागात पोहचलेली आहे. अजूनही अनेक देशात स्त्रियांना किमान प्राथमिक हक्क सुद्धा बहाल केलेले नाही. जातीय दंगली, युद्धे, दुष्काळ, स्थलांतर इत्यादी काळात सर्वात जास्त अन्याय अत्याचाराला सामोर जावे लागते. अनेक देशात अजूनही पुरुषप्रधान संस्कृतीचे वर्चस्व असल्यामुळे साधे साधे हक्क ही स्त्रियांना दिले जात नाही. उदा. शौदी अरेबियामध्ये वाहन चालविण्याचा अधिकार सुद्धा स्त्रियांना नाही. या उदा. वरुन स्त्रियांच परिस्थिती समजण्यासारखी आहे. जगातील अनेक देशात स्त्रियांना कायदेशीर संरक्षण दिलेले असले तरी अनेक स्त्रिया कायद्याचा वापर करत नाही. एखाद्या स्त्रीने त्याविरुद्ध बंड करण्याचा प्रयत्न केला तर दहशतीच्या मार्गाने त्या स्त्रीला नष्ट करण्याचा प्रयत्न केला जातो. उदा. मलाईका नावाच्या मुलीने पाकिस्तानात मुलीच्या शिक्षणासाठी तालिबानच्या धमकीकडे दुर्लक्ष केल्यामुळे तालिबानी दहशतवाद्यांनी तिच्या वर गोळ्या झाडल्या. अशी अनेक उदाहरणे सांगता येतात. महिलाच्या हक्काप्रति आजही असंवेदनशील वृत्ती समाजात दिसून येते. स्त्रियाकडे मालमत्ता किंवा उपभोगाची वस्तू म्हणून पाहिले जाते. त्यातून स्त्री हक्क ही लांबची गोष्ट आहे. जोपर्यंत समाजात स्त्रियाकडे पाहण्याच्या वृत्तीत सकारात्मक बदल झाल्याशिवाय स्त्री सबलीकरणाला भवितव्य नाही.

स्त्रीवाद ही संकल्पना प्राथमिक अवस्थेत असली तरी भावी का ळात स्त्रियामध्ये जाणीव जागृती निर्माण झाल्यास किंवा राजकीय सत्ते स्त्रियांना समानभागीदारी मिळाल्यास स्त्री सबलीकरण भवितव्य उज्ज्वल होऊ शकते.

**सारांश-**

स्त्री सबलीकरण चळवळीसमोर दारिद्र्य, अज्ञान, गुलामगिरी, स्त्री भ्रूणहत्या, मातृत्व नाकारण्याची वृत्ती, स्त्रियांची कमी होत जाणारी लोकसंख्या, लैगिंक शोषण व कुमारी माता हे भीषण प्रश्न आहेत. म्हणून पुरुष वर्गाचा तिरस्कार हा चळवळीचा आधार न ठेवता पुरुषी सहयोगातून ही चळवळ यशस्वी कर काळाची गरज आहे. स्त्रियामध्ये जागृती निर्माण करुन त्यांच्यात हितसंबंधी गट वा दबाब गट म्हणून भूमिका विकसित कर णे आवश्यक आहे. स्त्री सबलीकरण चळवळी अजूनही बराच लांबचा पल्ला गाठावयाचा आहे. त्यासाठी लोकशा ही आणि संयमाच्या मार्गाने आंदोलनाची हाताळणी करणे आवश्यक आहे. कारण जागतिकीकरणाच्या चळवळीला गती येत आहेत. स्त्री पुरुष समानतेवर नागरी व्यवस्थेची प्रस्थापना केल्याशिवाय मानवी जातीला उज्जवल भवितव्य नाही.

**संदर्भ सूची**


- डॉ. पी. डी. देवरे, डॉ. डी. एस. निकुंभ, आधुनिक राजकीय विचारप्रणाली (२००८) जळगाव: प्रशांत प्रकाशन, पृ.३२६.
- बसु, डी. डी. भारतीय का संविधान एक परिचर (२००३) नवी दिल्ली: वाधवा एन्ड कंपनी, पृ. 28
- डॉ. सुशीला शक्तीवतर, महिला मानवाधिकार (२०१२) (संपा. शैलेन्द मौर्य) जयपुर: अविष्कार पब्लिशर्स, पृ. ४१
- डॉ. एम. एन. सिंह, मानवाधिकार और महिलाये, (२०११) इलाहाबाद: परिधि प्रकाशन, पृ. ४१
- अविनाश माहेश्वरी, महिला अधिकार और कानून, (२०११) जयपूर: प्रिज्म बुक्स, पृ. १८
- डॉ. सुनिल महसर, राज्य एवं महिला मानवाधिकार, (२०११) जयपूर: पोइन्टर पब्लिशर्स, पृ. २३१